सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २५१ | बुधवार, दि. ३ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
**सोने-चांदी**
**आजचे भाव**
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १५१०००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १४००००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११६०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २६००/-
भाव प्रती १० ग्राम

# दोन तहसीलदारांसह ६ अधिकाऱ्यांना नोटिस

## सावखेडा वाळू प्रकरण



## जिल्हाधिकाऱ्यांच्या कारवाईने महसूल वर्तुळात खळबळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील सावखेडा येथील वाळू घाटावर कायद्याचे सर्रास नियमांचे उल्लंघन झाल्याचे समोर आले असून, याप्रकरणी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी कडक पावले उचलली आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी अमळनेर व चोपडा येथील तहसीलदार, मंडळाधिकारी आणि तलाठ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून २४ तासांच्या आत खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत. या कारवाईमुळे महसूल वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

अमळनेर तालुक्यातील सावखेडा येथील तापी नदीवरच्या वाळू घाटावर जप्त केलेल्या वाळूसाठ्याचापोटी १२ लाख ७९ हजार ३४४ रुपयांचा दंड ठोठावला आहे. तर जप्त यंत्रणा सामुग्री पोटी १ कोटी ६१ लाख ७० हजारांना दंड ठोठावला आहे. एकीकडे दंडात्मक कारवाई होत असताना दुसरीकडे जिल्हाधिकाऱ्यांनी जबाबदार यंत्रणेला कारवाईच्या रडारवर आणले आहे.

त्यानुसार अमळनेरचे तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, चोपड्याचे भाऊसाहेब थोरात, सावखेड्याचे मंडळाधिकारी कल्याणी पाटील, तलाठी पवनकुमार शिंगारे, निमगव्हाणचे मंडळाधिकारी सुरेश पाटील व तलाठी तिलेश पवार यांना नोटीस बजावून २४ तासांच्या आत खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे खुलासे प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी कारवाईचा निर्णय घेणार आहेत

दरम्यान, सूत्रांच्या माहितीनुसार दोषी ठरल्यास तहसीलदार, तलाठी व मंडळाधिकाऱ्यांवर कारवाई होणार आहे. अशी चर्चा आहे.

आजचे
अभीष्टचिंतन



श्री. उमेश वाल्हे
माजी शहराध्यक्ष : भाजप

## धावडे येथे बेकायदेशीर वाळू उपसा आणि डिझेल साठ्याप्रकरणी कारवाईची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील मौजे धावडे येथील वाळू घाटावरून मोठ्या प्रमाणावर होत असलेली वाळूची चोरी आणि सावखेडा परिसरामध्ये मिळून आलेल्या बेकायदेशीर डिझेल साठ्याप्रकरणी संबंधित दोषींवर तातडीने कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी धावडे ग्रामपंचायतीचे सरपंच तथा प्रशासक आणि ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात सरपंच ॲड. उमाकांत भास्कर पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने अमळनेरचे तहसीलदार यांना जाहीर निवेदन तहसीलदारांना दिलेल्या पत्रात अर्जदारांनी म्हटले आहे की, मौजे धावडे येथील वाळू घाटावरून मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर वाळू उपसा (वाळू चोरी) झाल्याची घटना उघडकीस आली आहे. मात्र, या गंभीर प्रकरणावर प्रशासनाकडून अद्यापपर्यंत नेमकी काय कारवाई करण्यात आली, याचा कोणताही अधिकृत खुलासा करण्यात आलेला नाही. वाळू माफियांवर झालेल्या कारवाईत पूर्ण पारदर्शकता असावी, यासाठी प्रशासनाने या कारवाईचा सविस्तर तपशील जाहीर करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. वाळू चोरीसोबतच सावखेडा येथील वाळू घाटावर सापडलेल्या बेकायदेशीर डिझेल साठ्याचा मुद्दाही या निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे.

हा अवाढव्य आणि अनधिकृत डिझेल साठा नेमका कोणत्या पेट्रोल पंपावरून पुरवला गेला आणि त्या संबंधित पेट्रोल पंपावर प्रशासनाने आतापर्यंत काय कायदेशीर पावले उचलली, याचाही खुलासा अद्याप झालेला नाही. या डिझेल पुरवठा करणाऱ्या पंपाचा शोध घेऊन त्याचा परवाना रद्द करावा आणि संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी पत्रात करण्यात आली. धावडे घाटातील वाळू चोरी थांबवून या संपूर्ण गैरप्रकाराची चौकशी व्हावी यासाठी या निवेदनाच्या प्रती उपविभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी, अमळनेर) आणि जळगावचे जिल्हाधिकारी यांच्याकडेही माहिती व तात्काळ कारवाईसाठी रवाना करण्यात आल्या आहेत.

या निवेदनावर सरपंच ॲड. उमाकांत भास्कर पाटील यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य एस. पी. पाटील, आर. बोरसे, ए. एस. बोरसे, सौ. के. प्र. पाटील व इतर ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. प्रशासनाने यावर तात्काळ ठोस पावले उचलली नाहीत, तर ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

## मंगळग्रह मंदिरात 'गो-सन्मान अभियान'चे उद्घाटन उत्साहात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे राबविण्यात येत असलेल्या 'गो-सन्मान आवाहन अभियान' चे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

यावेळी संस्थेचे सचिव श्री. सुरेश बाविस्कर, सहसचिव श्री.दिलीप बहिरम, खजिनदार श्री. गिरीशजी कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी श्री. शरद कुलकर्णी तसेच अभियानाच्या समन्वयक सौ. मीना शहा उपस्थित होते. मंगळग्रह मंदिर परिसरात आयोजित या अभियानास भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

गो-संवर्धन व गो-सन्मानाचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या सह्यांच्या मोहिमेत सहभागी होण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली. अनेकांनी स्वखुशीने अभियानाला पाठिंबा दर्शवत आपली नोंदणी व स्वाक्षरी केली. या अभियानाच्या माध्यमातून गोमातेच्या संरक्षण, संवर्धन आणि सन्मानासाठी समाजात व्यापक जनजागृती निर्माण करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. मंदिर परिसरात दिवसभर भाविकांचा उत्साह आणि सहभाग पाहायला मिळाला. "गोमाता ही भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे; तिच्या सन्मानासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढे यावे," असा संदेश यावेळी उपस्थित मान्यवरांनी दिला.



*अमळनेर : गो सन्मान अभियानाचे उद्घाटन करताना मंगळग्रह सेवा संस्थेचे सुरेश बाविस्कर, गिरीश कुलकर्णी, शरद कुलकर्णी, मिना शहा आणि रोहित पाटील (छायाचित्र : नितेश बारी)*

**दिनविशेष**
३ जून

- जागतिक सायकल दिन
- महर्षी कर्वे यांनी भारतातील पहिल्या महिला विद्यापीठाची स्थापना केली.
- हिंदुस्थानच्या फाळणीसाठी माउंटबॅटन योजना जाहीर करण्यात आली.
- जमिनीवरील हवेतील लक्ष्यावर मारा करणाऱ्या त्रिशूल क्षेपणास्त्राची द्रोणाचार्य या युद्धनौकेवरून कोचीजवळ यशस्वी चाचणी झाली.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेव्हा-तेव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## प्रवीण गंगाराम पाटील यांचा अपक्ष अर्ज दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अमळनेर : विधान परिषदेच्या जळगाव स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जागेसाठी अमळनेरचे नगरसेवक प्रवीण गंगाराम पाटील उर्फ राजुदादा फापोरेकर यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज सादर केला. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मोठी गर्दी उसळली होती.

महायुतीकडून भाजपचे नंदकिशोर महाजन, महाविकास आघाडीकडून शिवसेना ठाकरे गटाचे शरद तायडे, तसेच प्रवीण गंगाराम पाटील यांच्यासह एकूण १४ अपक्ष उमेदवारांनी अर्ज दाखल केले.

जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींमध्ये या निवडणुकीबाबत उत्सुकता वाढली असून, अंतिम लढत कोणामध्ये होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## दोन सांडांचा थरार; मोकाट जनावरांच्या धुमाकुळाला जबाबदार कोण?



*अमळनेर : नगरपालिके जवळील शॉपिंग कॉम्प्लेक्स येथे मोकाट जनावरांची झुंज.*

**जबाबदार कोण?**

शहरात मोकाट गुरांची संख्या वाढली आहे.मात्र पालिका मोकाट गुरे आवरण्यात अपयशी ठरत आहे.अनेक वेळा रस्त्याच्या मधोमध हि गुरे टोळी करून बसतात अथवा उभी राहतात. मोकाट सांडांमुळे वाहनांचे नुकसान किंवा जीवितहानी झाल्यास जबाबदारी कोणाची, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून मोकाट जनावरांवर नियंत्रण आणावे, अशी मागणी जोर धरत आहे.घटनेनंतर संतप्त नागरिकांनी प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली. वारंवार अशा घटना घडत असतानाही दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. भविष्यात अधिक गंभीर दुर्घटना टाळण्यासाठी नगरपालिका व संबंधित विभागांनी तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी होत आहे.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील नगरपालिकेच्या मागील परिसरात सोमवारी दुपारी दोन सांडांमध्ये रंगलेल्या तुफानी झुंजीने परिसर हादरून गेला.

तब्बल दीड तास सुरू असलेल्या या झुंजीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अनेकांनी सुरक्षित ठिकाणी धाव घेतली. दुपारी सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास दोन सांड आमनेसामने आले आणि काही क्षणांतच त्यांच्यात जोरदार झुंज सुरू झाली. एकमेकांवर धडक देत, शिंगांनी वार करत दोन्ही सांडांनी परिसरात अक्षरशः धुमाकूळ घातला.

या झुंजीदरम्यान तेथे उभ्या असलेल्या काही दुचाकी व चारचाकी वाहनांचे नुकसान झाले.

अचानक घडलेल्या या प्रकारामुळे महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र एखादा नागरिक या झुंजीच्या विळख्यात सापडला असता तर मोठी दुर्घटना घडली असती, अशी चर्चा नागरिकांमध्ये रंगली होती.

दरम्यान, शहरात मोकाट जनावरांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. सांड, गायी व इतर जनावरे रस्त्यांवर मुक्तपणे फिरताना दिसत असून वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याबरोबरच अपघातांचे प्रमाणही वाढत आहे.



## देवस्थान जमिनी वहिवाटदारांना हस्तांतरित करण्याच्या प्रस्तावाला महाराष्ट्र मंदिर महासंघाचा कडाडून विरोध

### राज्यभर आंदोलन छेडण्याचा दिला इशारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्र शासनाकडून देवस्थान इनाम व मंदिराच्या जमिनी वहिवाटदारांना हस्तांतरित करण्यासाठी आणल्या जाणाऱ्या प्रस्तावित कायद्याला महाराष्ट्र मंदिर महासंघाने तीव्र विरोध दर्शविला आहे. यासंदर्भात महासंघाच्या अमळनेर शाखेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, स्थानिक खासदार स्मितताई वाघ, माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील आणि उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदन देऊन हा प्रस्ताव तातडीने मागे घेण्याची मागणी केली आहे. महासंघाच्या मते हा प्रस्तावित कायदा हिंदू देवस्थानांचे अस्तित्व संपवणारा असून तो भूमाफियांचे खिसे भरण्याचा डाव आहे.



*अमळनेर : उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदन देतांना मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर,सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी,विश्वस्त डी .ए.सोनवणे जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी आणि मंगळ सेवेकरी बाळा पवार आदी. (छायाचित्र : रजनीकांत पाटील)*

सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या निकालांनुसार देवस्थान जमिनी वहिवाटदारांना वाटण्याचा अधिकार कोणालाही नाही. हिंदू देवस्थान जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर देवस्थान प्रतिबंधित सत्ता प्रकार अशी नोंद करण्याचे परिपत्रक काढावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र मंदिर महासंघाने निवेदनाद्वारे काही महत्त्वपूर्ण सूचनाही केल्या आहेत. वक्फ बोर्डाच्या धर्तीवर देवस्थानांनाही संरक्षण मिळावे, गुजरातच्या धर्तीवर महाराष्ट्रातही 'अँटी लँड ग्रॅबिंग' (जमीन बळकावण्याविरोधी) कायदा लागू करावा. देवस्थानची जमीन हडपणाऱ्यांना १४ वर्षे सश्रम कारावास आणि अजामीनपात्र शिक्षेची तरतूद करावी. गेल्या २५ वर्षांतील जमिनींच्या हस्तांतरणाची आणि बोगस नोंदींची चौकशी करण्यासाठी सनदी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक स्थापन करावे. न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्यासाठी जलदगती न्यायालये स्थापन करून सहा महिन्यांत खटले मार्गी लावावेत. जर हा अन्यायकारक प्रस्ताव मागे घेतला नाही, तर राज्यभर तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा महासंघाने दिला आहे.

सदर निवेदनावर संतश्री प्रसाद महाराज, मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिंगबर महाले, सचिव सुरेश बाविस्कर, सुभाष पाटील, नाना निळे, पवन लांडगे, ज्ञानेश्वर पाटील, संजय पाटील आदींच्या सह्या आहेत.

## वादळात झाड पडून 'विप्रो बोगदा' ठप्प

### प्रसूतीसाठी निघालेली महिला अडकली, मुख्तार खाटीक यांच्या पुढाकाराने मार्ग मोकळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : वादळामुळे झाड पडल्याने विप्रो बोगद्यातील वाहतूक ठप्प झाली. कायद्याच्या अडचणीमुळे झाड बाजूला करता येत नव्हते. दरम्यान, प्रसूतीसाठी दवाखान्यात जाणारी एक महिला रस्त्यात अडकून पडली होती. अखेर माजी नगरसेवक मुख्तार खाटीक पुढे आले. त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा करून रस्ता मोकळा केला आणि सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला.

जोरदार वादळामुळे विप्रो कंपनीकडे जाणाऱ्या रेल्वे बोगद्यात झाड आडवे पडले. त्यामुळे तांबेपुरा, सानेनगर, नंदगाव, लडगाव, तासखेडा, अंतुर्ली, रंजाणे, अंबारे, खापरखेडा, करणखेडा, मुडी, दरेगाव, हिंगोणे आदी गावांकडे जाणारा रस्ता बंद झाला. झाड रेल्वे हद्दीत असल्याने आरपीएफकडून त्याला हात लावण्यास मनाई करण्यात आली. मुळात विप्रो बोगदा हा रस्ता नसून नाला असल्याने येथे वाहतूक करू नये, असे फलक यापूर्वीच रेल्वे प्रशासनाने लावले होते. त्यामुळे रेल्वे प्रशासन झाड हटविण्यासही परवानगी देत नव्हते. हा मार्ग नेहमी वापरात असल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. दरम्यान, पलीकडे एक महिला प्रसूतीसाठी जात असताना रस्त्यात अडकून पडली होती.

घटनेची माहिती मिळताच माजी नगरसेवक मुख्तार खाटीक घटनास्थळी पोहोचले. मात्र, आरपीएफने सुरुवातीला विरोध केला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन खाटीक यांनी रेल्वे प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. "झाड तोडण्याचा खर्च आम्ही करू, तसेच झाड तुमच्या हद्दीतच ठेवू; मात्र रस्ता मोकळा करणे अत्यावश्यक आहे," असे सांगत त्यांनी अधिकाऱ्यांना विनंती केली. शेवटी प्रशासनाने मानवी दृष्टिकोनातून निर्णय घेत नियमांत लवचिकता दाखवली आणि गुलाम नबी यांच्या मदतीने झाड कापून रस्ता मोकळा करण्यात आला. नागरिकांनी समाधान व्यक्त करत मुख्तार खाटीक यांचे आभार मानले.

## संपादकीय

# कवी जातो, म्हणजे काय...

इथले जगणे म्हणजे प्रत्येकाला आपापल्या परीनेच जगावे लागणार, पण ते सुंदर करणे आपल्या हाती आहे. त्यासाठीच्या समविचारीपणाचे आवाहन बशीर बद्र यांच्या शायरीने केले...कलावंत जातो, कवी जातो, म्हणजे काय होते? तारे एरवीही तुटतच असतात, पण कवी जातो तेव्हा बहुधा दूरची एखादी नदी आटते. पाण्याच्या ओढीने तिच्याकडे येणारे पशुपक्षी गोंधळतात, तिच्या काठचे गवत कोळपू लागते, मग झुडपे माना टाकतात. आता उरलो आहोत बशीर बद्र यांच्याभोवती जिवंतपणीच वलय देणाऱ्या या आख्यायिका जाणणारे आपण. आणि त्या वलयाच्या पलीकडे गेलेल्या बशीर बद्र यांचे शेर, त्यांच्या गज़ल. आपल्याला शोधावे लागणार आहे या गज़लचे 'भूजल'. त्यासाठी बशीर बद्र काय होते याबरोबरच काय नव्हते हेही आकळून घ्यावे लागेल. तेव्हा प्रथम ते काय नव्हते याबद्दल. गालिब-मीर, ज़ौक किंवा नजीर अकबराबादी या एकोणिसाव्या शतकापर्यंत होऊन गेलेल्या शायरांचा जमाना निराळा होता, याचे भान विसाव्या शतकातल्या अनेकांप्रमाणेच बशीर बद्र यांनाही होते. पण ते अनेक ज्यांपैकी अलामा इक्बालसारखे स्वप्नाळू; फैज अहमद फैज, साहिर लुधियानवी, कैफी आझमी, जाँनिसार अख़्तर हे 'तरक्कीपसंद'; तर कमर जलालाबादींसारखे प्रेमार्त शायर लोकांपर्यंत पोहोचले- हे सारेच 'जुने' शायर आहेत आणि आपण नवे, हे बद्र यांना उमगले. दुष्यंतकुमार, निदा फाज़ली, शहरयार आणि गुलज़ार हे त्यांचे थेट समकालीन.

सर्वांचा जन्म १९३० च्या दशकातला आणि भाषेवर प्रेम करू लागण्याच्या वयात स्वातंत्र्याचा जल्लोष / फाळणीचा विषाद चौघांनीही पाहिलेला. फाजली आणि शहरयार अंतर्मुख, 'आपुलाचि वाद आपणासी' या पंथातले; तर दुष्यंतकुमार थेट लोकांशी बोलणारे, परिस्थितीवर भाष्य करणारे. या तिघांच्या मधले बशीर बद्र. आणि गुलजार? 'मै डॉ. बशीर बद्र का बहुत बडा फैन हूं।' अशी कबुलीच गुलज़ार देतात, कारण 'त्यांची गज़ल आजची आहे- त्यांच्या गज़लच्या पहिल्या दोनेक शेरांमधून विषय उभा राहतो! यात बद्र यांचे 'डॉक्टर' असणेही महत्त्वाचे; कारण वडिलांचा अकाली मृत्यू, मग कॉलेज सोडून नोकरी आणि संसारही सुरू, नोकरीत स्थिरस्थावर झाल्यावर पुन्हा 'एमए'पर्यंत शिकल्यावर, स्वातंत्र्योत्तर उर्दू गज़लच्या अभ्यासावरच मिळवलेली पीएच.डी. हे सारे त्या डॉक्टरकीमागे आहे. अभ्यास आहेच पण परिस्थितीशी झगडणेही आहे. त्या संघर्षाची प्रेरणा पुन्हा शायर असण्यातच शोधावी लागते. मी शायर, म्हणून माझ्या काळाच्या कोणत्या टोकावर मी उभा आहे हे मला माहीत हवे, या बौद्धिक गरजेपायी त्यांचा अभ्यास झाला. भव्यतेचे वा उदात्ततेचे आकर्षण वाजिद अली शाहपर्यंत शोभते, पुढे त्याचे आधारच विरळ होतात आणि ते स्वप्नाळू ठरते; किंवा शायराने दुनियेतल्या तमाम गरिबांचा कैवार घेण्याचा कितीही आव आणला तरी मूलभूत भावना सर्वांनाच असतात आणि समोरची 'शमा', तीवर झेपावणारे 'परवाने' याकडे दुर्लक्ष करून कुणाला शायर होता येत नसते, अशा दुखण्यांचे नेमके निदान या डॉक्टरसाहेबांनी केले असणार. या निदानाची, त्यामागच्या भानाची आणि त्याहीमागच्या मानी कविमनाची साक्ष त्यांच्या शेरांमधून, गज़लांमधून मिळते. जगजीत सिंगच्या आवाजातले बशीर बद्र तलम आहेत. 'मुझ से बिछड़ के खुश रहते हो। 'मध्ये तर ते प्रेमविव्हल भासतात. पण याही गज़लचा मक्ता- अखेरचा शेर- 'तुम तन्हा दुनिया से लडोगे। बच्चों सी बाते कर रहे हो।।' अशा साध्या शब्दांत वास्तवाचे भान देणारा आहे. बद्र यांच्या शेरांत प्रेमातला दुरावा आहे. ती हुरहूर हीच त्यांच्या गज़लचा प्राण. पण बऱ्याचदा तो दुरावा दोघा प्रेमिकांपैकी कुणी तरी निवडलेला आहे- प्रेमात किंवा दुराव्यातही फार ईश्वरी वा सैतानी हात नाहीत. कारण मुळात, अलौकिकाचे फाजील आकर्षण बद्र यांना नाही. ते लौकिकच. म्हणून लोकांचे कवी. त्यांच्या मते अलौकिक म्हणजे फक्त कला- शायरी, गज़ल. 'मुझे खुदा ने गज़ल का दयार बख्शा है। ये सल्तनत मै मुहब्बत के नाम करता हूं।।' ही त्यांची प्रेमाविषयीची भूमिका. प्रेम व्यक्त असो वा अव्यक्त, ते असणे बद्र यांच्यासाठी महत्त्वाचे. 'यूं ही कोई बेवफा नही होता' हा त्यांच्या सल्तनतीतला न्याय. उर्दू शायरांची परंपराच आपापली नैतिक भूमिका शोधून काढण्याची. चारचौघांनी मान्य केलेल्या नैतिकतेपेक्षा निराळे काही असू शकते आणि ते काय हे मी सांगतो ऐका- हा गालिबपासून अनेकांचा पवित्रा. त्याला बरेचसे लोक बंडखोरी म्हणतात; पण हे सारे बंडखोर प्रेमाच्या बाबतीत 'मऊ मेणाहूनी' असतात, ते ईश्वरनिंदा करत नाहीत- उलट उमर खय्यामपासूनच्या मार्गाने जात इथल्या दुनियेतच देवत्व-खुदाई-शोधतात. 'उस की आँखे मुझे मीरा का भजन लगती है' असे म्हणणारे बद्रही याच मार्गावरले. पण त्यांची नैतिक भूमिका स्वतंत्र भारताला आणि त्या भोवतीच्या जगाला शोभणारी. 'मै ये दुनिया मिटाना चाहता हूँ। नया सब कुछ बनाना चाहता हूँ।।' या ओळी बद्र यांनी लिहिणे धक्कादायकच, पण तो धक्का दुसऱ्या शेरातच निवळू लागतो आणि 'मेरे अन्दर कोई ज़ालिम छुपा है। मै चिडियाघर बनाना चाहता हूँ।।' हा मक्ता तर, क्रांतीच्या मक्तेदारांना लाजेने माना खाली घालायला लावतो.

हे इथले जगणे प्रत्येकाला आपापल्या परीनेच जगावे लागणार, पण ते सुंदर करणे आपल्या हाती आहे- त्यासाठी मात्र काहीएक समविचारीपणा हवा आणि ते आवाहन माझ्या शायरीत आहे, एवढीच त्यांची भूमिका. त्यामुळेच मेरठचे घर, त्यातली पुस्तके / हस्तलिखिते जळाल्यावरही ते कुणाला तळतळाट देत नाहीत. 'जे तुम्ही जाळून टाकलेत, ते उभारण्यासाठी जीव तोडावा लागतो हो...' एवढेच सुनावतात. आपण संत नव्हे, कवीच आहोत आणि कवीम्हणूनच हे सांगतो आहोत, ही नैतिक जाणीव त्यामागे असते. बद्र यांच्याच 'मीर- कबीर- बशीर इसी मकतब के है। आ दिल के मकतब में अपना नाम लिखा।।' या ओळींमधल्या 'मकतब'चा अर्थ 'प्राथमिक शाळा' असा होतो हे माहीत झाल्यावर त्या जाणिवेचे असणे लख्खपणे लक्षात येते. या जाणिवेचा प्रवाह बशीर बद्र यांच्या जाण्याने आटला. अभिजातपणाचा सांधा आधुनिकतेशी भिडवू पाहणाऱ्या पिढीचा शायर आपण गमावला. 'आज हम सब एक बेहतर जिंदगी की दौड में। कैसे कैसे ख्वाब कब्रों में सुलाने आये है।।' ही अस्वस्थता 'बद्र' हे उपनाव घेतलेल्या डॉ. सय्यद मुहम्मद बशीर यांनी दिली. 'बद्र' म्हणजे चंद्र. तोही पुनवेचा. तो हवा, तर आटलेला प्रवाह वाहता करून, त्यात या चंद्राचे बिंब पाहावे लागेल!

# वॉचमन ते २०० कोटींचा मालक! 'या' अभिनेत्याचा थक्क करणारा प्रवास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



बॉलिवूडमध्ये दरवर्षी एकापेक्षा एक सरस कलाकार पाऊल ठेवतात आणि आपली एक वेगळी ओळख निर्माण करतात. पण आज आपण ज्या अभिनेत्याबद्दल बोलत आहोत, तो एकेकाळी चित्रपटांपासून दूर अगदी सामान्य आयुष्य जगत होता आणि आपल्या करिअरसाठी अत्यंत कठीण प्रसंगातून जात होता. या अभिनेत्याने आपले शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर विज्ञानाची पदवी घेतली. पण एक काळ असा आला, जेव्हा त्यांना नोकरीच्या शोधात अनेक शहरांचे उंबरठे झिजवावे लागले.या संघर्षाच्या काळात त्यांनी गुजरात मधील वडोदरा येथे एका पेट्रोकेमिकल कंपनीत केमिस्ट म्हणून नोकरी केली. तिथे त्यांचे काम केमिकल टेस्टिंग आणि लॅबशी संबंधित होते. त्यांची नोकरी ठीकठाक चालली होती, पण त्यांच्या मनात नेहमी काहीतरी वेगळं करण्याची इच्छा होती. लहानपणापासूनच चित्रपट आणि अभिनयाची आवड त्यांच्या मनात घर करून होती, जी त्यांना हळूहळू थिएटर (रंगभूमी) च्या दुनियेकडे खेचत होती. नोकरी करत असताना मनात चाललेल्या या इच्छेने त्यांना आतून अस्वस्थ केले होते.शेवटी नोकरी सोडून या अभिनेत्याने आपल्या मनाचे ऐकले आणि दिल्ली गाठून ते थिएटरशी जोडले गेले. तिथे त्यांनी प्रसिद्ध नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामध्ये प्रवेश घेतला आणि अभिनयाचे धडे गिरवण्यास सुरुवात केली. पण थिएटरमधील आयुष्य सोपे नव्हते. पैशांची इतकी चणचण होती की, अनेकदा उदरनिर्वाहासाठी त्यांना वॉचमन (सुरक्षारक्षक) म्हणूनही नोकरी करावी लागली. याच काळात त्यांनी छोट्या-मोठ्या ऑडिशन्स देण्यास सुरुवात केली आणि चित्रपटांमध्ये काम मिळवण्यासाठी प्रयत्न करत राहिले. सुरुवातीच्या दिवसांत त्यांना फक्त छोट्या भूमिका मिळायच्या, ज्यामुळे स्वतःची ओळख निर्माण करणे कठीण होते.हळूहळू चित्रपटसृष्टीत या अभिनेत्याच्या मेहनतीला फळ येऊ लागले. अनेक वर्षांच्या अथक परिश्रमानंतर त्यांना एक असा चित्रपट मिळाला, ज्याने त्यांचे संपूर्ण आयुष्यच बदलून टाकले. तो चित्रपट होता 'गँग्स ऑफ वासेपूर', ज्याने त्यांना एका रात्रीत स्टार बनवले. या चित्रपटातील त्यांनी साकारलेल्या भूमिकेने प्रेक्षकांच्या मनात असे स्थान निर्माण केले की, लोक त्यांच्या संवादांचे आणि अभिनय शैलीचे वेडे झाले. या चित्रपटानंतर त्यांचे नाव सर्वत्र गाजू लागले आणि त्यांना इंडस्ट्रीत एक स्वतंत्र ओळख मिळाली.आता तुमच्याही मनात उत्सुकता वाढली असेल की अखेर हा अभिनेता आहे तरी कोण? तर हे दमदार व्यक्तिमत्त्व दुसरे कोणी नसून, अत्यंत प्रतिभावान अभिनेते नवाजुद्दीन सिद्दीकी आहेत. त्यांनी पुढे 'द लंचबॉक्स', 'बजरंगी भाईजान', 'रमन राघव २.०', 'मंटो' आणि 'रात अकेली है' यांसारख्या अनेक उत्कृष्ट चित्रपटांमध्ये काम केले. प्रत्येक भूमिकेतील त्यांचा अभिनय इतका जिवंत असायचा की चाहते थक्क होऊन जायचे.आज नवाजुद्दीन सिद्दीकी केवळ भारतातच नव्हे, तर जगभरात त्यांच्या अभिनयासाठी ओळखले जातात. छोट्या भूमिकांपासून सुरू झालेला हा प्रवास आज अशा टप्प्यावर पोहोचला आहे, जिथे लोक त्यांची गणना चित्रपटसृष्टीतील सर्वात प्रतिभावान अभिनेत्यांमध्ये करतात. आज त्यांनी इंडस्ट्रीत स्वतःचे एक अढळ स्थान निर्माण केले आहे. असे म्हटले जाते की, अशी एकही भूमिका नाही जी ते चोखपणे बजावू शकत नाहीत.

# ब्लॉकेज असतील तर दिसतात 'ही' लक्षणे

## वेळीच ओळखा- हार्ट ठणठणीत ठेवण्याचा सोपा उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजकाल खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी आणि चुकीच्या लाइफस्टाईलमुळे नसांसंबंधी अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. नसांमध्ये ब्लॉकेज ही त्यातील एक कॉमन समस्या आहे.

**नसांमध्ये ब्लॉकेज म्हणजे रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा**

यामुळे शरीरात ब्लड सर्कुलेशन योग्यपणे होत नाही. नसांमध्ये ब्लॉकेज होण्याची कारणं वेगवेगळी असतात. जसे, की चुकीचे खाणे-पिणे, लठ्ठपणा, कमी शारीरिक हालचाल, हाय कोलेस्टेरॉल आणि धुम्रपान इत्यादी.

जर वेळीच ही लक्षणे ओळखली गेली तर गंभीर धोका टाळला जाऊ शकतो. अशात जाणून घेऊ नसांमध्ये ब्लॉकेज झाल्यावर दिसणाऱ्या काही लक्षणांबाबत...



**छातीत वेदना...**

नसांमध्ये ब्लॉकेजेस झाल्यावर व्यक्तीच्या छातीत वेदना किंवा जडपणा जाणवू शकतो. नसांमध्ये ब्लॉकेजमुळे ऑक्सिजनयुक्त रक्त हृदयापर्यंत योग्य प्रमाणात पोहोचत नाही. ज्यामुळे छातीत वेदना होतात. या वेदना हलक्या ते गंभीर असू शकतात. सामान्यपणे छातीच्या मधोमध वेदना होते. जर तुम्हाला असं लक्षण दिसत असेल तर वेळीच डॉक्टरांना संपर्क करा.

**श्वास घेण्यास अडचण...**

नसांमध्ये ब्लॉकेज झाल्यावर श्वास घेण्यास समस्या होऊ शकते. ब्लॉकेजमुळे शरीरात पुरेसं ऑक्सिजन पोहचत नाही. याच कारणानं श्वास घेण्यास समस्या होते. ही समस्या शरीराच्या हालचाली दरम्यान अधिक जाणवते. थोडी मेहनत केल्यावरही श्वास भरून येत असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**थकवा आणि कमजोरी...**

जास्त थकवा आणि कमजोरी जाणवणं हा सुद्धा नसांमध्ये ब्लॉकेजचा संकेत असू शकतो. नसा ब्लॉक झाल्यामुळे हृदयाला रक्त पंप करण्यासाठी अधिक मेहनत करावी लागते. यामुळेच व्यक्तीला पुन्हा पुन्हा थकवा आणि कमजोरी जाणवते. जर तुम्हालाही असं काही लक्षण दिसत असेल तर वेळीच डॉक्टरांना भेटा.

**चक्कर येणे...**

नसांमध्ये ब्लॉकेज झाल्यावर चक्कर येणे किंवा बेशुद्ध पडणे असं लक्षण दिसू शकतं. नसा ब्लॉक झाल्यामुळे मेंदुपर्यंत योग्य प्रमाणात ऑक्सीजन पोहोचत नाही. ज्यामुळे चक्कर येणे किंवा बेशुद्ध पडणे अशा समस्या होतात. असं लक्षण दिसलं तर वेळीच सावध व्हा.

**हात-पाय थंड पडणे...**

जर तुमचे हात-पाय नेहमीच थंड राहत असतील तर नसांमध्ये ब्लॉकेज असण्याचं संकेत असू शकतो. ब्लॉकेज झाल्यावर रक्त पुरवठा योग्य पद्धतीने होत नाही. ज्यामुळे हात-पाय थंड जाणवू शकतात. त्याशिवाय अनेक लोकांना हात-पायांमध्ये वेदना किंवा सूज जाणवू शकते. जर तुम्हाला असं लक्षण दिसलं तर डॉक्टरांना दाखवा.



**अमळनेर : दाऊदी बोहरा समाजातर्फे प्रवाश्यांना शितपेय वाटप करण्यात आले. यावेळी दाऊदी बोहरा समाजाचे प्रमुख शेख अली हुसेन भाई सैफी, शेख मोहम्मद भाई करमपुरवाला, शेख अब्बास भाई सैफी, मकसूद बोहरी आणि जाकीर क्रोकरीवाला यांच्यासह बद्री ग्रुपमधील अली असगर बोहरी, शब्बीर हुसेन आणि मयदी ग्रुपमधील होजेफा सैफी, ताहेर इझी, अब्दुलकादर आझाद, हकीमुद्दीन बोहरी, शब्बीर बुकवाला, उबे सैफी आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**



### *श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या पालखीचे अमळनेरात आगमन*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेरः येथे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट यांची पालखी यात्रा दि. ६ जून २०२६ रोजी सकाळी ९.०० ते ११.०० वाजेदरम्यान सौ. सुलोचना जयवंतराव वाघ यांच्या घरी (शंकरनगर, स्वामी निवास, पिंपळे रोड) येथे आगमन होणार आहे. अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ यांचा महिमा सर्वश्रुत आहे.

सर्व सेवेकरी बंधू-भगिनींनी दर्शनाचा लाभ घ्यावा.

# वैभव सूर्यवंशीच थेट दिसणार चित्रपटात? थेट प्रसिद्ध दिग्दर्शकाने केली पोस्ट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वैभव सूर्यवंशी हा आतापर्यंत आयपीएलमध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे, ज्याच्याकडे सध्या ऑरेंज कॅप देखील आहे. दरम्यान, एका प्रसिद्ध दिग्दर्शकाने केलेल्या पोस्टने सर्वांचे लक्ष वेधले आहे.वयाच्या १४व्या वर्षी आपल्या कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधणारा क्रिकेटपटू म्हणून वैभव सूर्यवंशी ओळखला जातो. त्याने आयपीएलमध्ये अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. सध्या वैभव सूर्यवंशी क्रिकेटमुळे नाही तर एका वेगळ्या कारणामुळे चर्चेत आहे. तो एका चित्रपटात दिसणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. आता हा चित्रपट कोणता आहे? बॉलिवूडचे दिग्गज चित्रपट निर्माते शेखर कपूर यांनी त्यांच्या एक्स अकाऊंटवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी वैभव सूर्यवंशीचे भरभरुन कौतुक केले आहे. तसेच त्यांनी त्यांचा आगामी चित्रपट 'मासूमः द न्यू जनरेशन'मध्ये वैभवला घेण्याची इच्छा व्यक्त केली आहे. चित्रपट निर्मात्याच्या या पोस्टने सोशल मीडियावर नवीनच खळबळ उडवून दिली आहे.

शेखर कपूर यांनी १९९६ मध्ये 'मासूम' हा चित्रपट बनवला होता, ज्यामध्ये नसीरुद्दीन शाह आणि शबाना आझमी दिसले होते. आता शेखर कपूर या चित्रपटाचा सीक्वल 'मासूमः द न्यू जनरेशन' बनवण्याची योजना आखत आहेत. वृत्तांनुसार, या चित्रपटात दिग्गज संगीतकार ए. आर. रहमान आपले संगीत देणार आहेत. दरम्यान, शेखर कपूर यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' वर एक पोस्ट शेअर केली, ज्यामध्ये त्यांनी आयपीएल २०२६ चा युवा क्रिकेटपटू आणि 'न्यू संसेशन' वैभव सूर्यवंशी याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. 'मासूम' चित्रपटाचे दिग्दर्शक शेखर कपूर हे १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या शानदार फलंदाजीचे चाहते झाले आहेत. शेखर कपूर यांनी आज त्यांच्या सोशल मीडिया 'एक्स' अकाऊंटवर वैभव सूर्यवंशीचा फोटो शेअर करत लिहिले की, 'जर सूर्यवंशी इतका लोकप्रिय आणि शानदार क्रिकेटपटू नसता, तर मी त्याला माझ्या 'मासूमः द न्यू जनरेशन' या चित्रपटात कास्ट केले असते.' शेखर यांची ही पोस्ट काही वेळातच इंटरनेटवर व्हायरल झाली, त्यानंतर चाहते वेगवेगळ्या प्रतिक्रिया देत आहेत.शेखर कपूर यांचा आगामी चित्रपट 'मासूमः द न्यू जनरेशन' हा १९८३ मध्ये आलेल्या 'मासूम' चित्रपटाचा सीक्वल आहे. 'मासूमः द न्यू जनरेशन' ही कुटुंब, प्रेम आणि स्थलांतराबाबत (मायग्रेशन) बदलत्या विचारसरणीची कथा आहे. तसेच चित्रपटाला इमोशनल टच देखील देण्यात येणार आहे. वृत्तांनुसार, या चित्रपटात नसीरुद्दीन शाह, शबाना आझमी, मनोज बाजपेयी, नित्या मेनन आणि कावेरी कपूर यांच्यासारखे कसलेले कलाकार दिसणार आहेत. तसेच वैभव सूर्यवंशी दिसणार की नाही याबाबत माहिती समोर आलेली नाही.




# मंगळग्रह सेवा संस्थेत बाल कीर्तन सेवेचा प्रेरणादायी उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्री विश्व माऊली ज्ञानाई आध्यात्मिक वारकरी गुरुकुल, आळंदी देवाची येथील ह.भ.प. सोपान शिरसाठ महाराज, ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज, ह.भ.प. पूर्वाताई तसेच ४० बाल कीर्तनकार यांच्यावतीने मंगळग्रह मंदिरात एक दिवसीय बाल कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले.

अंबऋषी टेकडी येथे आयोजित पंधरा दिवसांच्या बालसंस्कार शिबिरासाठी आलेल्या या बाल कीर्तनकारांनी मंगळग्रह मंदिरात एक दिवस कीर्तन सेवा देण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार दिनांक ३० मे २०२६, शनिवार रोजी सायंकाळी ६.३० ते ८.३० या वेळेत दोन तासांचा अत्यंत भावपूर्ण व भक्तिमय बाल कीर्तन सेवा कार्यक्रम संपन्न झाला. ह.भ.प. पूर्वाताई यांच्या मार्गदर्शनाखाली बाल कीर्तनकारांनी आपल्या ओजस्वी वाणी,अभंग,भजन आणि कीर्तनातून उपस्थित भाविकांना अध्यात्म, संस्कार आणि भक्तीचा संदेश दिला. त्यांच्या सादरीकरणाने मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

याप्रसंगी सोबत आलेल्या सर्व ४० बाल कीर्तनकारांना मंगळग्रह मंदिरातर्फे महाप्रसादाची सेवा देण्यात आली. तसेच त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या उपक्रमामुळे बालसंस्कार,वारकरी परंपरा आणि अध्यात्मिक मूल्यांचे संवर्धन करण्यास मोठी प्रेरणा मिळाली. याप्रसंगी मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर,सहसचिव श्री दिलीप बहिरम उपस्थित होते.मंगळग्रह सेवा संस्था या सर्व बाल कीर्तनकारांचे, गुरुजनांचे व आयोजकांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करते आणि त्यांच्या भावी कार्यास शुभेच्छा देते.



**अमळनेर : बालकिर्तनाचा आनंद घेताना मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहीरम, कैलास महाजन व बालकिर्तनकार**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# ८,००० ची नोकरी ते २३,००० कोटींचा मालक

## शाळा ड्रॉपआऊट निखिल कामथचे एका कल्पनेमुळे बदलले आयुष्य

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

निखिल कामत यांचे नाव आज शेअर बाजारात मोठे आहे. पण यामागचा प्रवास अतिशय खडतर आहे. नितीन आणि निखिल या दोन्ही कामथ बंधूंनी शून्यातून जग उभारले आहे आणि आज कोट्यवधींचे मालक आहेत.

भारतातील सर्वांत मोठ्या रिटेल ब्रोकरेज फर्म, झिरोधाचे सह-संस्थापक निखिल कामथ यांची यशोगाथा एखाद्या चित्रपटाच्या कथेपेक्षा कमी नाही. जगात असे मानले जाते, की मोठ्या यशासाठी उच्च पदव्या आणि उच्चभ्रू शिक्षण आवश्यक आहे. पण निखिल कामथ यांनी वयाच्या १७ व्या वर्षी दहावी सोडून यशाचा नवीन पाया प्रस्थापित केले. त्यांच्या पालकांच्या अनोख्या संगोपनाने आणि त्यांच्या अपारंपरिक तत्त्वांनी त्यांच्या या प्रवासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. १९८६ मध्ये कर्नाटकातील एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या निखिल कामथ यांना पुस्तके आणि अभ्यासात कधीच आपले ध्येय सापडले नाही. ते स्वतः कबूल करतात की त्यांना शाळेचा तिरस्कार होता. त्यांना पारंपरिक शिक्षणासाठी सक्ती करण्याऐवजी त्यांच्या पालकांनी त्यांना त्यांची जिज्ञासा जोपासण्याची परवानगी दिली. निखिल कामथ यांचा उद्योजकतेचा प्रवास वयाच्या १४ व्या वर्षी सुरू झाला.

नववीत असताना त्यांनी आणि त्यांच्या एका मित्राने वापरलेले मोबाईल फोन खरेदी-विक्री करण्यास सुरूवात केली. नफा चांगला होता, पण जेव्हा त्याच्या आईला याबद्दल कळले तेव्हा तिने रागाच्या भरात सर्व फोन टॉयलेटमध्ये फ्लश करून टाकले. या घटनेमुळे त्याचा उत्साह कमी झाला नाही. उलट त्याला जोखीम पत्करण्यास आणि अपयशातून शिकण्यास अधिक प्रेरणा मिळाली.

निखिल कामथने एका पॉडकास्टमध्ये खुलासा केला आहे, की त्याने २००० च्या दशकाच्या सुरूवातीला बेंगळुरूमधील एका कॉल सेंटरमध्ये आपली पहिली नोकरी सुरू केली.



त्यावेळी तो वार्षिक सुमारे ८८,००० रुपये म्हणजेच महिन्याला ७,००० ते ८,००० रुपये कमवत असे. निखिल रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करायचा. त्याचा विश्वास आहे की या साध्या नोकरीने त्याला शिस्त आणि कामाची नैतिकता शिकविली. ज्यामुळे पुढे त्याला झिरोधासारखी मोठी कंपनी उभी करण्यास मदत झाली.

निखिल कामथच्या मते त्याचे पालक काही अशी तत्त्वे पाळत होते जी आजच्या काळात दुर्मिळ आहेत. त्यांच्या घरात प्रयोग करण्याचे स्वातंत्र्य होते. जर एखादी गोष्ट यशस्वी झाली नाही, तर तो शेवट मानला जात नसे, तर तो एक धडा मानला जात असे. जेव्हा निखिलने वयाच्या १५-१६ व्या वर्षी शाळा सोडण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्याच्या पालकांनी त्याच्यावर दबाव टाकण्याऐवजी त्याला स्वतःचा मार्ग निवडू दिला.

एका कॉल सेंटरमध्ये रात्रीच्या पाळीत काम करण्यास सुरुवात केली आणि फावल्या वेळेत स्टॉक ट्रेडिंग शिकला. त्याच्या पालकांनी शैक्षणिक यशालाच यशाचे एकमेव मोजमाप कधीच मानले नाही. निखिल कामथ यांचा विश्वास आहे की त्यांचे यश पुस्तकांमधून नव्हे, तर जीवनातील अनुभवांमधून आणि चुकांमधून आले आहे. त्यांच्या पालकांचा दृष्टिकोन कठोर आज्ञापालनापेक्षा स्वातंत्र्याला अधिक महत्त्व देणारा होता.

निखिलने आपला भाऊ नितीन कामथ यांच्यासोबत २०१० मध्ये झिरोधाची स्थापना केली. त्यांच्या धोरणात्मक दूरदृष्टीने भारतातील रिटेल ब्रोकरेज क्षेत्रात क्रांती घडवली. त्यांनी डिस्काउंट ब्रोकरेज मॉडेल सादर केले, ज्यामुळे सामान्य लोकांसाठी शेअर बाजारात गुंतवणूक करणे सोपे आणि अधिक परवडणारे झाले. फोर्ब्सनुसार निखिल कामथ यांची एकूण संपत्ती अंदाजे २३,००० कोटी रुपये आहे. ते भारतातील सर्वांत श्रीमंत स्व-निर्मित अब्जाधीशांपैकी एक आहेत.

# उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यासाठी १० प्रभावी टिप्स...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**१) सकाळी उठल्यावर पाणी पिणे...**
सकाळी उठल्यानंतर लगेच १ ग्लास थंड (साधे माठातील) पाणी प्यावे.

**२) लिंबू पाणी...**
शक्य असल्यास दररोज सकाळी रिकाम्यापोटी लिंबू-पाणी घ्यावे.

**३) ताकाचे सेवन...**
शरीराला थंडावा मिळण्यासाठी रोज १ ते २ वेळा ताक नक्की प्यावे.

**४) नारळ पाणी...**
नारळाचे पाणी हे नैसर्गिकरीत्या थंड असते. त्याचा समावेश तुमच्या दैनंदिन आहारात करा.

**५) पुरेसे पाणी पिणे...**
घराबाहेर पडण्यापूर्वी नेहमी भरपूर पाणी पिऊन बाहेर पडावे.

**६) डोके झाकून ठेवा...**
उन्हात बाहेर फिरताना डोक्याला रुमाल किंवा टोपी लावून डोके झाकून ठेवावे.

**७) सुती कपड्यांचा वापर...**
उष्णतेपासून वाचण्यासाठी नेहमी सुती (कॉटनचे) आणि हलके कपडे घालावेत.

**८) तळलेले पदार्थ टाळा...**
जास्त तेलकट, तळलेल्या किंवा भाजलेल्या पदार्थांचे सेवन करणे टाळावे.

**९) पुदिना पाणी...**
पिण्याच्या पाण्यात पुदिना घालून ते पाणी प्यावे. यामुळे शरीराला ताजेतवाने वाटते.

**१०) बेलचे सरबत...**
उन्हाळ्यात बेलचे सरबत पिणे आरोग्यासाठी आणि शरीर थंड ठेवण्यासाठी खूप फायदेशीर ठरते.

# ना प्लॅटफॉर्म, ना तिकीट खिडकी

## भारतातील अनोख रेल्वे स्टेशन, जेथे ठेकेदार विकायचा तिकीट





**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात असे एक रेल्वे स्टेशन आहे जेथे ना प्लॅटफॉर्म, ना तिकीट खिडकी, तरीही ट्रेन तेथे थांबते. एक ठेकेदार करतो तिकीट विक्री. कुठे आहे हे रेल्वे स्टेशन?
भारतात अशी काही रेल्वे स्टेशन आहेत, की जी वेगवेगळ्या कारणांसाठी सोशल मीडियावर चर्चेत असतात. पण तुम्हाला माहिती आहे का? की भारतात असे एक रेल्वे स्टेशन आहे जेथे ना प्लॅटफॉर्म, ना तिकीट खडकी. तरीही ट्रेन तेथे थांबते. ठेकेदार विक्री करतो तिकीट.

हे ठिकाण राजस्थानमधील भारत-पाकिस्तान सीमेजवळ असलेल्या लीलमा आणि जैसिंधर येथे आहे. या रेल्वे स्थानकांची अनोखी कहाणी सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. अनेक वर्षे ही स्थानके विना प्लॅटफॉर्मशिवाय चालत होती, तिथे तिकीट खिडकी देखील नव्हती. प्रवाशांना तिकीट देण्यासाठी एक ठेकेदार बॅगभर तिकिटे घेऊन ट्रेन येण्याच्या काही मिनिटांपूर्वी स्टेशनवर पोहोचत असे आणि तेथूनच तिकीट विक्री केली जात होती. राजस्थानातील बाडमेर जिल्ह्यात भारत-पाक सीमा भागात ही स्थानके आहेत. सीमावर्ती आणि कमी लोकसंख्या असलेल्या भागामुळे येथे रेल्वे सुविधांचा विकास खूपच मंद गतीने झाला. त्यामुळे अनेक वर्षे प्रवाशांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागले.

या स्थानकांवर प्लॅटफॉर्म नसल्याने ट्रेन थेट रुळांच्या कडेला थांबत असे. प्रवाशांना खाली उभे राहूनच डब्यात चढावे लागत होते. महिला, वृद्ध आणि मुलांसाठी हा प्रवास विशेषतः धोकादायक आणि त्रासदायक ठरत होता. सामानासह ट्रेनमध्ये चढताना अनेकदा अपघाताची शक्यता निर्माण होत असे.
मात्र, आता या स्थानकांचे चित्र बदलू लागले आहे. उत्तर-पश्चिम रेल्वेकडून येथे सुमारे ६०० मीटर लांबीचे प्लॅटफॉर्म बांधण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. यासोबतच वीज आणि इतर आवश्यक सुविधा देखील विकसित केल्या जात आहेत.

# वाय-फाय राउटरपासून १० फूट लांब ठेवा एक गोष्ट

## इंटरनेटची स्पीड रॉकेटसारखी वाढेल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



घरात हाय-स्पीड इंटरनेट प्लॅन असूनही अनेकदा वाय-फायचा स्पीड अचानक कमी होतो. या समस्येसाठी आपण कंपनीला दोष देतो. पण खरी अडचण राउटरच्या शेजारी ठेवलेले इतर गॅझेट्स असू शकतात. काही इलेक्ट्रॉनिक वस्तूंमुळे वाय-फाय सिग्नल्समध्ये अडथळा निर्माण होतो. त्यामुळे राउटर आणि इतर उपकरणांमध्ये किमान १० फुटांचे अंतर राखणे आवश्यक आहे. चला तर मग याविषयीची माहिती जाणून घेऊ.

इंटरनेटचा उत्तम स्पीड मिळविण्यासाठी वाय-फाय राउटरची जागा अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. घरात राउटरच्या अगदी जवळ टीव्ही, मायक्रोवेव्ह किंवा ब्लूटूथ स्पीकर्स ठेवल्यास सिग्नल्स कमकुवत होतात. म्हणूनच इंटरनेटचा अखंड आणि वेगवान प्रवाह राखण्यासाठी राउटर योग्य उंचीवर आणि इतर कोणत्याही वायरलेस गॅजेट्सपासून दूर ठेवण्याचा सल्ला दिला जातो.

**हे गॅझेट ८-१० फूट अंतरावर ठेवा**

तुमच्या घरात डिजिटल बेबी मॉनिटर असेल आणि तो वाय-फाय राउटरजवळ ठेवला असेल तर तो सिग्नलमध्ये व्यत्यय आणेल. याचे कारण असे आहे की बरेच बेबी मॉनिटर्स राउटर ज्या २.४ गीगाहर्ट्झ वारंवारतेवर कार्य करतात त्याच वारंवारतेवर कार्य करतात. जर बेबी मॉनिटर आणि राउटर एकमेकांपासून काही फूट अंतरावर ठेवले असतील तर आपल्याला फक्त बेबी मॉनिटर राउटरपासून थोडे दूर ठेवणे आवश्यक आहे. BGR.com रिपोर्टनुसार दोघांमध्ये किमान ८-१० फूट अंतर असले पाहिजे.

**'हा' फोन ३-५ फुटांच्या अंतरावर असावा**

त्याचप्रमाणे काही कॉर्डलेस फोन मॉडेल्स देखील केवळ २.४ GHz बँडवर कार्य करतात. ज्यामुळे इंटरनेट स्पीडमध्ये फरक पडू शकतो. राउटर आणि कॉर्डलेस फोनमध्ये ३-५ फुटांचे अंतर ठेवा.

**'या' गोष्टीही काढून टाका**

वाय-फाय राउटर आणि सीसीटीव्ही कॅमेरे एकमेकांच्या अगदी जवळ ठेवले असतील तर आपला वाय-फाय राउटर व्यत्यय आणू शकतो. सुरक्षा कॅमेरे सतत क्लाऊडवर व्हिडिओ अपलोड करतात. यामुळे उपलब्ध बँडविड्थवर अधिक ताण येऊ शकतो, ज्यामुळे इतर डिव्हाइसवरील इंटरनेटचा वेग कमी होऊ शकतो.
वाय-फाय राउटर अनेकदा टीव्हीजवळ ठेवले जातात. तज्ञांचे म्हणणे आहे की बऱ्याचदा स्मार्ट टीव्ही इथरनेट केबलद्वारे राउटरला कनेक्ट केले पाहिजेत. हे व्यत्यय कमी करते आणि आपल्या टीव्हीची इंटरनेट गती सुधारते. त्याचप्रमाणे स्मार्ट होम डिव्हाइसेस देखील राउटरपासून दूर ठेवले पाहिजेत. ते एकाच वेळी बऱ्याच डिव्हाइसशी कनेक्ट केलेले असतात आणि त्या भागात इतके सिग्नल पाठवू शकतात की आपला राउटर व्यत्यय आणेल. २.४ GHz बँडवर अवलंबून असलेल्या राउटरमध्ये ही समस्या अधिक सामान्य आहे.

**राऊटर ठेवण्याची योग्य जागा**

- घराच्या मध्यभागी ठेवा: राऊटर नेहमी घराच्या अशा ठिकाणी ठेवा, जिथून सर्व खोल्यांमध्ये सिग्नल्स समान प्रमाणात पोहोचतील.
- उंचीवर ठेवा: राऊटर टेबलवर किंवा भिंतीवर 3 ते 5 फूट उंचीवर ठेवा. जमिनीवर ठेवल्यास सिग्नल्स खालच्या बाजूला ब्लॉक होतात.
- खुल्या जागेत ठेवा: राऊटर कपाटात किंवा कोपऱ्यात लपवून ठेवू नका. खुल्या जागेत सिग्नल्सचा प्रवाह चांगला राहतो.










# श्री मंगळग्रह मंदिरात आजपासून पंचदिन साध्य विष्णू पंचायन याग

## अधिकमास महात्म्य कथेचेही आयोजन; व्यास श्री. वे. मू. हरिषाचार्य गुरुजी करणार निरुपण


श्री. वे. मू. हरिषाचार्य गुरुजी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिरात अधिकमासानिमित्ताने बुधवार, दि. ३ जून ते रविवार, दि. ७ जून २०२६ दरम्यान पंचदिन साध्य विष्णू पंचायन याग व अधिकमास महात्म्य कथेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. ३ जून २०२६ रोजी अधिकमासातील संकष्ट चतुर्थीच्या पवित्र पर्वात सकाळी ९ वाजता या यागाचा प्रारंभ होईल. आशियास्टार आयकॉन अवॉर्ड प्राप्त, अखिल भारतीय भाविक वारकरी मंडळाचे, जळगाव जिल्हाध्यक्ष तसेच समाजकार्य फाऊंडेशन, अमळनेरचे तालुकाध्यक्ष डॉ. सुप्रीम संजय पाटील हे प्रमुख यजमान असतील. तर नाशिक निवासी व्यास श्री. वे. मू. हरिषाचार्य गुरुजी यांच्या पवित्र वाणीतून अधिकमास महात्म्य कथेचे निरूपण केले जाईल. सदर याग दररोज दोन सत्रांत होईल.

दररोज सकाळी ९ ते ११ यावेळेत अभिषेक व अर्चन, तर दुपारी ३ ते ४ या वेळेत हवन पूजा होईल. तसेच दुपारी ४ ते सायंकाळी ६ वाजेदरम्यान व्यास श्री. वे. मू. हरिषाचार्य गुरुजी अधिकमास महात्म्य कथेचे निरूपण करतील. त्यानंतर सायंकाळी ६ ते ६.३० या वेळेत श्री मंगळग्रह देवतेची नियमित आरती होईल. या परम पवित्र यागाचे साक्षीदार होऊन अधिकमास महात्म्य कथेच्या श्रवणासाठी अमळनेर शहरासह तालुक्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती द्यावी, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्यासह समस्त विश्वस्त मंडळाने केले आहे.

# अधिकमास संकष्टी चतुर्थी केव्हा आहे ३ की ४ जून?

## चतुर्थीची नेमकी तारीख व चंद्रोदयाची वेळ आणि पूजाविधी जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात संकष्टी चतुर्थीला विशेष महत्त्व आहे. अधिक मासाच्या कृष्ण पक्षात येणाऱ्या चतुर्थीला विभुवन संकष्टी चतुर्थी म्हणून ओळखले जाते. अधिक मास दर तीन वर्षांनी एकदा येतो. त्यामुळे ही संकष्टी चतुर्थीसुद्धा दर तीन वर्षांनी एकदा येते. या दिवशी विधीपूर्वक गणपतीची पूजा केली जाते आणि उपवास केला जातो. असे मानले जाते की हे व्रत केल्याने सर्व अडचणी दूर होतात आणि जीवनात सुख-समृद्धीच्या संधी निर्माण होतात. यावेळी अधिक मासातील ३ आणि ४ जून दरम्यान येणाऱ्या संकष्टी चतुर्थीच्या तारखेबद्दल गोंधळ आहे. त्यामुळे ज्योतिषी राकेश झा यांच्याकडून विभुवन संकष्टी चतुर्थीची तारीख,चंद्रोदयाची वेळ, शुभ मुहूर्त आणि पूजेच्या पद्धतीबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊया.



### संकष्टी चतुर्थी कधी आहे?

अधिक मासाच्या कृष्ण पक्षातील चतुर्थी तिथी बुधवार, दि. ३ जून रोजी रात्री ९.२२ वाजता सुरू होईल. चतुर्थी तिथी दुसऱ्या दिवशी, गुरुवार, दि. ४ जून रोजी रात्री ११.३१ पर्यंत चालेल. चंद्रोदयाची वेळ ३ जूनला असल्याने संकष्टी चतुर्थीचा उपवास त्याच दिवशी केला जाईल. या उपवासादरम्यान चंद्राला अर्घ्य अर्पण करण्याला विशेष महत्त्व आहे. म्हणूनच चतुर्थी ४ जून रोजी दिवसभर असूनही चतुर्थीचे व्रत हे ३ जून रोजी केले जातील.

### संकष्टी चतुर्थी चंद्रोदयाची वेळ

संकष्टी चतुर्थीच्या दिवशी चंद्रोदय ३ जून रोजी रात्री १०.०४ वाजता होईल. उपवास करणारे या वेळी चंद्राचे दर्शन घेऊन त्याला दूध व जलाने अर्घ्य देऊ शकतात. चंद्राची पूजा केल्यानंतर गणपती बाप्पांची पूजा व आरती करावी मग व्रत सोडावे. संकष्टी चतुर्थीला चंद्रदर्शन महत्वाचे मानले जाते. असे केल्याने कुंडलीतील चंद्राची स्थिती मजबूत होते आणि जीवनात सुख व शांतीसाठी संधी निर्माण होतात.

### संकष्टी चतुर्थी पूजा विधी

संकष्टी चतुर्थीला सकाळी लवकर उठून स्नान करा आणि स्वच्छ कपडे घाला. या दिवशी लाल किंवा पिवळ्या रंगाचे वस्त्र परिधान करणे खूप शुभ मानले जाते.

गणपती बाप्पांचा जलाभिषेक करावा. त्यानंतर अष्टगंध लावावा व गणपती बाप्पांना दुर्वा अर्पण कराव्यात. तसेच जास्वंदीचे फुल वहावे. गणपती बाप्पांना या दिवशी तिळाचे लाडू आणि मोदकांचा नैवेद्य दाखवा. त्यानंतर धूप-दीप लावून देवाची पूजा करावी. गणपती स्तोत्र म्हणावे व गणपती मंत्राचा जप करावा. सर्वात शेवटी आरती म्हणावी व देवाला नैवेद्य दाखवून प्रसाद वाटावा. सायंकाळी पुन्हा संकष्टी व्रताची कथा वाचून चंद्रोदय झाल्यानंतर आरती करावी व उपवास सोडावा. या व्रतामुळे गणपती बाप्पांची कृपा लाभते आणि जीवनातील सर्व संकटे दूर होतात. गणपती बाप्पांना 'गणाधिप' म्हणजे सर्व गणांचा अधिपती मानले जाते. त्यामुळे या दिवशी त्यांची पूजा केल्याने सर्व प्रकारच्या समस्यांवर मात करता येते. हे व्रत केवळ शारीरिक आणि मानसिक शांतीच देत नाही, तर घरात सकारात्मक ऊर्जा निर्माण करते असे देखील मानतात.

# भगवान श्रीकृष्ण यांना कन्हैया हे नाव कसे पडले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एकदा यशोदा मैया छोट्या भगवान श्रीकृष्ण यांना झोपवत असताना 'कान्हा' असे म्हणाली. त्यावर भगवान श्रीकृष्ण म्हणाले, 'मैया'.

माता परत 'कान्हा' म्हणाली आणि यावर भगवान श्रीकृष्ण म्हणाले, 'मैया'. या मायलेकाचे हे 'कान्हा-मैया' असे सुरू असतानाच भगवान श्रीकृष्ण यांना झोप लागली. मातेलाही खूप झोप आली होती, पण ती तशीच 'कान्हा' म्हणाली, पुढे 'मैया' म्हणण्याच्या वेळी भगवान श्रीकृष्ण काही जागे नव्हते. त्यामुळे झोपेतच भगवान श्रीकृष्णांचे 'मैया'ही त्याची मैयाच म्हणाली. मातेने झोपेतच 'कान्हा - मैया' असे म्हटले आणि झोपेमुळे शेवटी तिच्या मुखातून 'कन्हैया' असे बाहेर पडले आणि माता झोपी गेली. कान्हा + मैया याचे झोपेत झाले कन्हैया.

दुसऱ्या दिवशी माता झोपेतून जागी झाली. पण गेल्या रात्रीच्या काही स्मृती तिच्या डोक्यात तशाच राहिल्या आणि ती उठल्या-उठल्या 'कन्हैया' असे म्हणाली आणि भगवान श्रीकृष्ण यांना एक नाव मिळाले 'कन्हैया'.

कन्हैया नावाची ही अशी गोष्ट वृजमध्ये सांगितली जाते. पण कन्हैया हे नाव छोट्या कृष्णासाठीच आहे, द्वारकाधीशांचे हे नाव नाही.




# पूजेसाठीचा कापूर बहुगुणी!

## 'या' शारीरिक समस्या होतील काही दिवसांत दूर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पूजेच्या वेळी कापूर वापरला जातो. असे मानले जाते की कापरामध्ये वास्तूदोष आणि घरातील नकारात्मकता दूर करण्याची क्षमता असते. या कारणास्तव कापूर अत्यंत पवित्र मानला जातो. पण तुम्हाला माहीत आहे का, की कापरामध्ये असे अनेक गुणधर्म असतात, जे तुमच्या सर्व शारीरिक समस्या दूर करू शकतात. कापरामध्ये अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात. यामध्ये अनेक औषधी गुणधर्म आहेत. जे शरीर आणि मन दोन्ही तंदुरुस्त ठेवण्यास मदत करतात. याशिवाय विविध समस्यांमध्ये कापूर कसा वापरावा, हेही समजून घेणे आवश्यक आहे.



कापरापासून कोणकोणते फायदे मिळतात, ज्याबद्दल आपण आतापर्यंत अनभिज्ञ आहोत. तणाव दूर करतो. कापराचा सुगंध मनाला शांत करतो. जर तुम्हाला जास्त ताण येत असेल, तर एका भांड्यात कापूर ठेवा आणि खोलीत ठेवा. यामुळे तणाव दूर होईल आणि तुम्हाला बरे वाटेल. शिवाय तुम्हाला रात्री चांगली झोपही लागेल. डोकेदुखी दूर करतो डोकेदुखीचा त्रास झाल्यास कापूर, शुंथी, अर्जुन वृक्षाची साल आणि पांढरे चंदन समप्रमाणात बारीक करून कपाळावर लावावे. थोडा वेळ तसेच पडून राहावे. या उपायाने तुम्हाला भरपूर आराम मिळेल.

स्नायू वेदना आणि खोकल्यामध्ये आराम स्नायूंच्या वेदना कमी करण्यासाठी कापूर देखील उपयुक्त मानला जातो. यासाठी मोहरीच्या तेलात कापूर टाकून नियमितपणे शरीराची मालिश करावी. खोकला झाल्यास या तेलाने छाती आणि पाठीला मालिश करा. तुम्हाला भरपूर विश्रांती मिळेल. तुम्ही मोहरीऐवजी तिळाचे तेलही वापरू शकता. शिवाय सर्दी झाल्यास गरम पाण्यात कापूर टाकून वाफ घेतल्याने खूप आराम मिळतो. खोबरेल तेलात कापूर मिसळून ते नियमितपणे त्वचेवर लावावे. यामुळे त्वचेवरील डाग दूर होतात आणि त्वचा स्वच्छ होते. पण जर त्वचा तेलकट असेल तर तज्ज्ञांचा सल्ला घेतल्यानंतर हे करा. खोबरेल तेलात कापूर मिसळून केसांमध्ये लावल्याने कोंड्याची समस्या दूर होऊन केस काळे राहतात. हिवाळ्यात टाचांना भेगा पडण्याची समस्या खूप सामान्य आहे. अशा स्थितीत कापूर तेलात पाणी मिसळा आणि त्यात काही वेळ पाय ठेवा. यानंतर पाय पुसून क्रीम किंवा तेल लावा. यामुळे तुम्हाला काही दिवसांत आराम मिळेल.

# हरवलेला महिना आणि सापडलेले संतुलन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एकदा काय झाले, की आकाशात सूर्य आणि चंद्र यांच्यात एक शांत पण महत्त्वाची स्पर्धा चालू होती. दोघेही आपापल्या मार्गाने जग चालवत होते. सूर्य म्हणाला, "मी ऋतू ठरवतो. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा माझ्यामुळेच पृथ्वीवर जीवनाचे चक्र चालते." चंद्र हसून म्हणाला, "आणि मी वेळ मोजतो. अमावास्या, पौर्णिमा, सण, व्रत लोकांच्या भावना माझ्याशी जोडलेल्या आहेत." दोघेही बरोबर होते. पण एक समस्या हळूहळू वाढत होती.



### गोंधळाची सुरूवात

चंद्राच्या वर्षात ३५४ दिवस होते आणि सूर्याच्या वर्षात ३६५ दिवस. दरवर्षी ११ दिवसांचा फरक वाढत गेला. सुरूवातीला कोणी लक्ष दिले नाही. पण काही वर्षांनी लोकांना जाणवायला लागले. दिवाळी कधी उन्हाळ्यात येऊ लागली. होळीचा ऋतू बदलायला लागला. सण आणि ऋतू यांचा ताळमेळ बिघडायला लागला. जगात एक अदृश्य गोंधळ निर्माण झाला.

एक 'नकोसा' महिना

या गोंधळातून एक अतिरिक्त महिना निर्माण झाला. पण त्याला कोणी स्वीकारायला तयार नव्हते. लोक म्हणाले, "तू कोण? तुला नाव नाही, स्थान नाही, तुझ्यात कोणताही सण नाही".

तो महिना एकटा पडला त्याला 'मलमास' म्हणत दुर्लक्षित केले जाऊ लागले. तो दुःखी झाला आणि थेट देवांकडे गेला.

### देवाची करुणा

तो महिना देवाकडे गेला आणि म्हणाला, "माझे अस्तित्व का आहे जर कोणी मला मानतच नाही?"

देव हसले आणि म्हणाले "तू विशेष आहेस. कारण तू संतुलन आणतोस. तुझ्यामुळेच वेळ पुन्हा योग्य मार्गावर येते." आणि त्यांनी त्या महिन्याला आपले नाव दिले 'पुरुषोत्तम मास'. त्या दिवसापासून जो महिना एकेकाळी नाकारला गेला होता तोच सर्वांत पवित्र मानला जाऊ लागला.

### विज्ञानाची गोष्ट

ही कथा आपल्याला भावना शिकवते. पण त्यामागे एक अचूक विज्ञान आहे. पृथ्वी सूर्याभोवती ३६५ दिवसांत फिरते. चंद्र पृथ्वीभोवती ३५४ दिवसांत त्याचे १२ महिने पूर्ण करतो. दरवर्षी सुमारे ११ दिवसांचा फरक निर्माण होतो. हा फरक साचत जातो. साधारण २.५ ते ३ वर्षांत तो एक पूर्ण महिना होतो. म्हणून हा 'अधिक मास' दिनदर्शिकेत जोडला जातो. सण व ऋतू पुन्हा संतुलित होतात.

### धार्मिक महत्त्व

अधिक मास आपल्याला एक वेगळी शिकवण देतो. जीवनात जे जादा वाटते तेच कधी-कधी सर्वांत महत्त्वाचे असते. हा महिना फक्त वेळेचा भाग नाही, तर आत्मशुद्धीचा काळ आहे. या काळात माणूस जाणीवपूर्वक थांबतो. बाहेरच्या गडबडीपासून दूर जाऊन स्वतःकडे वळतो. जप आणि नामस्मरण केले जाते. भगवंताचे नाव घेताना मन हळूहळू स्थिर होते. व्रत आणि उपवास पाळले जातात. शरीरावर नियंत्रण ठेवताना मनही शिस्तीत येते. दान आणि सेवा केली जाते. कारण या काळात दिलेले दान केवळ इतरांसाठी नसते, तर आपल्या मनालाही हलके करते. धार्मिक ग्रंथांचे वाचन केले जाते. जेणेकरून विचार अधिक स्वच्छ आणि सकारात्मक होतील आणि म्हणूनच लग्न, गृहप्रवेश, नवीन व्यवसाय, मोठे शुभ समारंभ टाळले जातात. हा काळ 'नवे काही सुरू करण्याचा नसून आधी स्वतःला समजून घेण्याचा आणि घडविण्याचा असतो. कारण आयुष्याच्या या सतत चालणाऱ्या प्रवासात 'अधिक मास' म्हणजे एक छोटासा विसावा असतो. असा एक थांबा जेथे आपण धावणे थोडे थांबवतो, पण थांबतो हरण्यासाठी नाही, तर स्वतःला पुन्हा सावरण्यासाठी नवी ऊर्जा निर्माण करण्यासाठी. जेणेकरून पुढचा प्रवास अधिक स्पष्ट अधिक मजबूत आणि अधिक सुंदर होईल.

### एक वेगळी जाणीव

कदाचित आपल्या आयुष्यातील 'अधिक मास' म्हणजेच तो काळ. ज्याला आपण टाळतो. पण जो आपली स्वतःशी भेट घडवतो. कधी-कधी आयुष्यातही असा 'अधिक मास' येतो. सगळे थांबल्यासारखे वाटते. पण खरेतर तोच काळ आपल्याला आतून घडवत असतो. कुणीतरी खूप सुंदर म्हटले आहे, "SOMETIMES STOPPING IS BETTER TO BOUNCE BACK HARD" आणि खोखर "कधी-कधी थांबणे म्हणजे मागे पडणे नसते. थांबण्यातही एक वेगळी ताकद असते आणि ही थांबलेली पावले हरवत नाहीत. ती फक्त उंच भरारीसाठी तयारी करत असतात".

### शेवटची जाणीव

अधिक मास आपल्याला सांगतो, "जी गोष्ट सुरूवातीला नकोशी वाटते. तीच कधी-कधी जीवनात संतुलन आणणारी ठरते".

# दिव्यांच्या या सोप्या उपायांनी लक्ष्मीचा लाभेल आशीर्वाद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अशी मान्यता आहे, की कुंडलीत असलेला राहू-केतूचा दोष दूर करण्यासाठी सकाळी पूजा करताना आणि सायंकाळी दिवा लावावा. यामुळे राहू-केतूच्या दोषापासून मुक्ती मिळते. तसेच दर शनिवारी शनी देवाच्या मंदिरात जर दिवा लावला तर शनीची साडेसाती नष्ट होते. तुमच्यावर सदैव शनी महाराजांची कृपा राहते.

### मान-सन्मानाच्या प्राप्तीसाठी

जर तुम्हाला समाजात तुमचा मान वाढवायचा असेल, सन्मान प्राप्त करायचा असेल तर दररोज सकाळी सूर्य देवाला अर्घ्य द्या आणि शुद्ध तुपाच्या दिव्याने सूर्य देवाची आरती करा. याने समाजात तुम्हाला मान -सन्मान मिळेल. सोबतच जर तुमचे एखादे मोठे काम अडले असेल तर ते देखील सूर्य देव मार्गी लावतील.

### घराची भरभराट होण्यासाठी

आठवड्याच्या प्रत्येक गुरुवारी भगवान विष्णूंसमोर शुद्ध तुपाचा दिवा लावावा. यामुळे तुमच्या घरात समृद्धी येईल. लक्ष्मी मातेची कृपा सदैव तुमच्यावर राहील. सोबतच तुम्ही प्रत्येक गुरुवारी दिवसातून एकदा १०८ वेळेस 'ओम नमो भगवते वासुदेवाय नमः' या मत्रांचा जप देखील करावा.

### पैशांच्या प्राप्तीसाठी

जर तुम्हाला पैशांच्या प्राप्तीमध्ये कोणतीही अडचण येत असेल, तर माता लक्ष्मींसमोर सातमुखी दीपक लावावा. या दिव्यामध्ये केवळ शुद्ध तूपच वापरावे. माता लक्ष्मींची प्रार्थना करावी. यामुळे लक्ष्मी प्राप्ती होऊन तुमच्या सर्व अडचणी, समस्या दूर होतात.



## पैशांच्या कमतरतेवर चांगला उपाय

घरात दिवा लावण्याची दिशा महत्त्वाची असू शकते. कारण हे वास्तुशास्त्रानुसार घरातील सकारात्मक ऊर्जा आणि समृद्धीला चालना देण्याचे कार्य करते. खाली दिलेल्या काही दिशांमध्ये दिवा लावल्यास त्याचे काय परिणाम होतात, हे दर्शवले आहे.

### पूर्व दिशा

**परिणाम :** पूर्व दिशा हा सूर्याच्या उगवण्याचा मार्ग आहे. या दिशेला दिवा लावल्याने घरात सकारात्मक ऊर्जा व वेल्थ (धन) येण्याचा विश्वास आहे. ही दिशा आपल्या आरोग्य, करिअर आणि मानसिक शांतीसाठी शुभ मानली जाते.

### दक्षिण दिशा

**परिणाम :** दक्षिण दिशा सूर्यास्ताच्या दिशेला आहे, आणि त्यास 'यम' मानले जाते. या दिशेला दिवा लावल्यास अपार्धिक समस्या आणि विवाद वाढू शकतात, म्हणून दक्षिण दिशेला दिवा लावण्याची शिफारस सामान्यतः कमी केली जाते. तरीही, दिवा लावल्यामुळे शक्ती आणि समृद्धी वाढू शकते, पण याचा प्रभाव कमी होतो.

### पश्चिम दिशा

**परिणाम :** पश्चिम दिशा सायंकाळी सूर्यास्तासाठी मानी जाते. या दिशेला दिवा लावल्याने शांतता, समृद्धी आणि घरातील वाद विवाद कमी होण्यास मदत होऊ शकते. ह्यामुळे घरात सुख-शांती आणि यशाचे आगमन होऊ शकते.

### उत्तर दिशा

**परिणाम :** उत्तर दिशा पैसे आणि समृद्धीशी संबंधित आहे, म्हणून या दिशेला दिवा लावल्याने आर्थिक प्रगती आणि सफलता मिळवता येते. ही दिशा धनसंपत्ति आणि समृद्धीला आकर्षित करणारी मानली जाते.

### उच्च स्थान (छत किंवा उच्च ठिकाणी)

**परिणाम :** घराच्या छतावर किंवा उच्च ठिकाणी दिवा लावल्याने घरातील ऊर्जा अधिक सकारात्मक आणि आकर्षक बनते. विशेषतः दीपमालिका किंवा दिव्याच्या लहान आकारांच्या शृंखलेने घरातील वातावरण सजवायला मदत होते. आध्यात्मिक दृष्टिकोनातून दिवा लावणे घराच्या प्रत्येक कोपऱ्यात साकारात्मक ऊर्जा आणि दिव्यता आणते. दिव्याचे ठिकाण आणि दिशा घराच्या वास्तुशास्त्राच्या अनुसार ठरवायला हवे. जेणेकरून घरातील ऊर्जा संतुलित आणि सामंजस्यपूर्ण राहील.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)